International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# भारतातील शेती समोरील आव्हाने आणि भविष्यातील शेती क्षेत्रातील संधी

**प्रा. डॉ. डी. डी. भोसले[1], विश्वनाथ बाजीराव कदम[2]**
[1]संशोधक मार्गदर्शक सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंत महा. नांदेड
[2]संशोधक विद्यार्थी यशवंत महा. नांदेड
**Corresponding Author – प्रा. डॉ. डी. डी. भोसले**
**Email:** kadamvb20@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10673344**

**प्रस्तावना :-**

भारतीय शेती क्षेत्र आज असंख्य संकटातून जात आहे. ज्यात निसर्गाचे संतुलन, बाजार भावातील प्रचंड चढउतार, शेती उत्पादन खर्चात होणारी भरमसाठ वाढ आणि आंतरराष्ट्रीय शेती विषयीचे राजकारण यांसारख्या अनेक समस्यांचा एकत्रित मारा आज शेती क्षेत्रावर होताना दिसत आहे. ज्याचा परिणाम म्हणून देशात आज शेतक-यांच्या आत्महत्या दिसवेन-दिवस वाढत आहेत. काही दिवसा पूर्वीच पंजाबच्या शेतक-यांनी वेगवेगळ्या मागण्यांसाठी मोठे आंदोलन केले. याचाच अर्थ भारतातील शेतकरी सध्याच्या व्यवस्थेत सुरक्षित नाही व शेती फायदेशीर नाही हे लक्षात येते. सद्यस्थितीत कोणालाच आपली मुले शेतकरी बनावीत असे वाटत नाही. येवढच काय तर बहुसंख्य शेतकरी शेती सोडून इतर व्यवसाय किंवा काम करण्यासाठी शहराकडे जात आहेत. असे असले तरी येणारा काळ हा ख-या अर्थाने शाश्वत शेतीचाच आहे यात मात्र काहीच शंका नाही.

भारत सरकारने 1991 च्या कालखंडात अर्थव्यवस्थेत मोठे बदल केले त्यात सरकारने खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा स्वीकार केला. या धोरणांमुळे भारतील अर्थव्यवस्थेत खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारले गेले ज्यामुळे भारतातील शेती सह इतर क्षेत्रावर ही या धोरणाचे अनेक परिणाम झाले. या धोरणामुळे शेती क्षेत्रात काही समस्या आणि काही संधी सुद्धा निर्माण झाल्या आहेत. या संधीचा आणि समस्यांचा आढावा या संशोधन परिपत्रकात घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :-**

1) शेती क्षेत्रा समोरील आव्हानाचा अभ्यास करणे.
2) शेती क्षेत्रात निर्माण झालेल्या आणि निर्माण होउ शकना-या नवनविन संधीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे.

**प्राथमिक तथ्य संकलन:-**

प्राथमिक तथ्य म्हणजे संशोधकाने निवडलेल्या विषयाची स्वत: संकलित केलेली माहिती होय. या शोध निबंधासाठी प्राथमिक माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यात पत्रकार, शेतकरी लाभार्थी, शेती क्षेत्रातील जाणकार, शेती तज्ञ, प्रयोगशील शेतकरी इत्यादीचा समावेश होतो. त्याच्याशी भारतातील शेती समोरील आव्हाने आणि भविष्यातील शेती क्षेत्रातील संधी या विषयावर प्रत्यक्ष चर्चा करुन माहितीचे संकलन केले आहे. या बरोबरच कृषी कार्यालयातील कर्मचारी आणि पदाधिकारी यांच्या सोबत सुद्धा चर्चा करुन माहिती मिळवली आहे.

**व्दितीय तथ्य संकलन:-**

या शोध निबंधातील समस्येचा निर्णया पर्यंत जाण्यासाठी व्दितीय माहितीचे सुध्दा संकलन करण्यात आले आहे. ज्यात शेती क्षेत्राशी निगडीत वेगवेगळी वृत्तपत्रे, मासिके, ग्रंथ, शोधप्रबंध आणि इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातील शेती क्षेत्रा समोरील आव्हाने**

वर्ष 2023-24 या वर्षी महाराष्ट्राच्या काही भागात पावसाने दांडी मारली तर काही भागात महापूर आणि गारपीठीने अतोनात शेतीचे नुकसान केले. याच्या मागील वर्षात जागतिक महामारी आणि त्यामुळे मंदी ची निर्माण झालेली परिस्थिती यामुळे शेती क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. असे आज पर्यंत प्रत्येक वर्षी चालत आलेले आहे. अशा अनेक समस्या भारतातील शेती क्षेत्रापुढे येत आहेत त्या पुढील प्रणाने पहाता येतील.

**1. भारताची वाढती लोकसंख्या :-**

शेती क्षेत्रच काय तर प्रत्येक क्षेत्राच्या प्रगतीचा आडसर ही भारतातील वाढती लोकसंख्या आहे. प्रत्येक विचारवंतांनी लोकसंख्या वाढ ही प्रत्येक समस्येचे मुळ असल्याचे व्यक्त केले आहे. जाणकारांच्या मते लोकसंख्या वाढीमुळेच प्रत्येक क्षेत्राच्या विकासावर ताण येऊन त्या क्षेत्राचा विकास खुंटतो. भारतात ही वाढती लोकसंख्या हेच ख-या अर्थाने सर्व समस्यांचे मूळ आहे. याला शेती क्षेत्र सुध्दा अपवाद ठरत नाही. भारतात आज घडीस एकूण लोकसंख्येच्या जवळपास 65-70 टक्के लोक हे शेती याच एका क्षेत्राशी निगडीत आहेत. किंवा त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. या उलट शेती शती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा मात्र दिवसेन दिवस घटत आहे. एकीकडे एकूण लोकसंख्येचा मोठा हिस्सा शेती वर अवलंबून आहे व दुसरी कडे या क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान सुद्धा अल्प आहे. म्हणजेच भारतात 65 ते 70 टक्के लोक

समुदायाकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा केवळ 16 टक्के हिस्सा आहे असे समजण्यास काहीच हरकत नाही. 1950-51 मध्ये मात्र याच शेतीचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा 56 टक्के होता. तो सातत्याने घटून 2019-20 मध्ये केवळ 14 टक्के येवठा अल्प राहिलेला आहे. वाढत जाणा-या लोकसंख्ये मुळे शेतीचे तुकडी करण होत असून त्यामुळे शेती ही नपरवडणारी होत आहे.

**2. वाढते शहरी करण :-**

शहरीकरण किंवा नागरी करण ही गांधीजींच्या विचारांच्या नेमकी विरुद्ध आहे. गांधी जी म्हणायचे की, खेड्याकडे चला परंतु आज नेमके त्याच्या विरुद्ध होताना आपण पहात आहोत. आज ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात शहराकडे येत आहेत. त्यात शेतकरी, शेतमजूर यांचाही समावेश आहे. शेतकरी शेती परवड नाही म्हणून ती शेती सोडून काम करण्यासाठी शहराकडे येत आहेत. याच बरोबर ग्रामीण भागातील शेतमजूर सुद्धा आज मोठ्या संख्येने शहराकडे येतांना दिसत आहेत. यामुळे ग्रामीण भागात शेती कसण्यासाठी मजूर मिळत नाहीत. गेल्या काही दशकात भारतात शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. आज घडीस भारत देशातील जवळपास एक तृतियांश लोक समुदाय शहरात वास्तव्यास आहे. व येणा-या काळात यात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

दुस-या बाजूने विचार केल्यास शहरीकरण जसे अ लाभदायक आहे तसेच ते फायद्याचेही आहे. कारण मोठं-मोठी शहरे ही मोठी बाजारपेठ असतात तेथे शेती मालास योग्य भाव मिळण्याची आशा असते. त्या शहरातील मोठा लोक समुदाय हा शेती मालाचा ग्राहक असतो. शेतक-यांनी त्यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना योग्य मालाचा पुरवठा केल्यास शेती ही नक्कीच फायद्याची ठरेल. कारण आजही शहरातील काही वर्ग दर्जेदार मालाच्या प्रतीक्षेत असतात. त्या ग्राहकांना मालाची शुद्धता याची हमी हवी असते. जसे आज शेतीतील शेंद्रीय उत्पादनास अलवचिक स्वरुपाची मागणी आहे. या सर्वाचा शेतकरी राजाने विचार करुन कार्य केल्यास नक्कीच शेती ही त्याची फलदायी ठरेल.

**3. सरकारचे आयात निर्यात धोरण:-**

भारतात शेती मालाचे आयात निर्यात धोरण राबवताना सरकार केवळ शहरी आणि मध्यम वर्गाचे हित विचारात घेते. हे धोरण आखताना सरकार शेतक-यांची बाजू मात्र विचारात घेत नाही. सरकार मध्यमवर्गीय आणि नोकरदार वर्गाचा विचार करुन तत्काळ नियमन करते परंतू त्याचे दूरगामी परिणाम मात्रा वाईट होतात याचा सरकारला विसर पडतो. याचाच परिणाम म्हणून भारतात शेतमालाची आयात वेगाने वाढत आहे परंतू निर्यातीत वेगाने वाढ होत नाही. मागील तीन वर्षात भारतातील शेत माल निर्यातीचा विचार केल्यास हे सहज लक्षात येते की, मागील तीन वर्षात भारतातील शेतमाल निर्यात 22 टक्के नी घटली आहे. एका बाजूला भारतीय बलाढ्य बाजारपेठ असतांना त्या बाजारपेठेचा भारतीय शेतक-यांना फायदा होत नाही. तर आयात धोरणामुळे त्या बाजार पेठेचा परकीय कंपन्या फायदा घेत आहेत. व भारतीय बाजारपेठ परकीय कंपन्यांच्या हातात जात आहेत. म्हणून सरकारने शेतमालाच्या आयात निर्यात धोरणाचा अवलंब करतांना शेतक-यांच्या हिताचाही विचार करावा.

दुसरीकडे दिवसेन दिवस रूपयाच्या बदल्यात अमेरिकन डॉलरचा भाव वाढत आहे. त्यामुळे भारतात आयात स्वस्त आणि निर्यात महाग होत आहे. व भारतातील उत्पादन तंत्र जुने असल्याने आपली उत्पादकता फारच कमी आहे. भारतातील शेतकरी किंवा शेती माल उत्पादक कंपन्या दुस-या देशातील बलाढ्य कृषी माल विकणा-या कंपन्या बरोबर स्पर्धा करू शकत नाहीत त्याचा निर्यातीवर मोठा परिणाम होत आहे. असे असतांना शेतक-यांनीच परकीय मागणीचा विचार करुन संपूर्ण शेतीत बदल करुन आणावा व सेंद्रिय रासायनिक मुक्त शेतीची सुरुवात करावी. याबरोबरच नवीन व आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करावा.

**4. उत्पादन तंत्रज्ञानातील बदल :-**

औद्योगीक क्रांती नंतर जगात सर्वच उत्पादन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान वापरास सुरुवात झाली. या औद्योगीक करणाची सुरुवात इंग्लंड मध्ये कापड उद्योगात झाली. आज या तंत्रज्ञानाचा वापर सर्वच क्षेत्र करतांना दिसत आहे. असे असतांना शेती क्षेत्रातही या नवीन तंत्राचा वापर अपरिहार्य पणे करणे भाग पडले. ज्यामुळे जगातील प्रगत देश शेतीतून अगणित उत्पादन घेत आहेत. तेंव्हा भारतीय शेती क्षेत्र या जागतिक स्पर्धेला तोंड देऊ शकत नाही. हे लक्षात घेता भारतातील शेतक-यांनी नवीन तंत्रज्ञानाच्या आधारावर उत्पादन पद्धती विकसीत करावी.

पर्यावरणाच्या -हासामुळे किंवा प्रदूषणामुळे आणि खनिज तेलाचे वाढते दर यामुळे आज बहुतांशी देश बायोडिझेल, इथेनॉल वापरासाठी आणि उत्पादनासाठी अनुदान देत आहेत. शेतकर-याच्या ऊसापासून इथेनॉल आणि सोयाबीन पासून बायोडिझेल तयार केले जात आहे. सध्या शेतकरी अन्नधान्य पुरवठ्या बरोबरच जगाला ऊर्जा देण्याच्या कार्यात सुद्धा उतरत आहे. व या क्षेत्रात शेतक-यांना मोठी संधी आहे. तेंव्हा जागतिक पातळीवरील तंत्रज्ञानात होणा-या बदला बरोबर शेतक-याने सुद्धा स्वत:ची उत्पादन पद्धती बदलली पाहिजे.

**5. असंघटित शेतकरी :-**

भारतात आणि महाराष्ट्रात आज राजकारणात कहर पहावयास मिळतो. देशातील प्रमुख पक्ष हे केवळ निवडणुका पुरताच विचार करुन लोकांना खुश करण्याचा प्रयत्न करत आहेत. केवळ तात्कालिक गोष्टींवरच राजकीय पक्ष लक्ष देत आहेत. त्यामुळे देशात दीर्घकालीन सुधारणा होणे गरजेचे आहे. दुसरीकडे भारतातील शेतकरी समाज हा संख्येने बहुसंख्य असला तरी तो असंघटित आहे. त्या असंघटनामुळे राजकीय पक्ष त्यांचा केवळ मतांसाठी वापर करत आहेत. हा गट संघटित नसल्यामुळे त्यांच्या हिताचे निर्णय त्यांना मिळत नाहीत. व शेती बाबत नियोजन बध्द विकास योजना आखल्या जात नाहीत. असे असतांना अनेक शेतकरी संघटनांनी प्रादेशिक स्वरुपाचे काम न करता त्यांनी

एकत्रित संघटन करुन सरकारला आपली ताकद दाखवली पाहिजे.

**6. काटेकोर शेतीच्या नवीन संधी:-**

शेती क्षेत्रात शेती उत्पादनाचे काही विशिष्ट वैशिष्ट्ये असतात. असे असतांना शेतक-यांनी आप-आपल्या भागातील कृषी मालाच्या उत्पादनाची वैशिष्टे लक्षात घेऊन उत्पादन केल्यास त्यांना ते लाभदायक ठरेल. त्यात उत्पादनाचे वैशिष्ट्ये म्हणजे कोणतेही उत्पादन हे पर्जन्यमान, तापमान , जमीन अशा अनेक गोष्टीवर अवलंबून असते त्यामुळे एका ठिकाणाचे उत्पादन दुसऱ्या ठिकाणी घेतल्यास त्याला चव व दर्जा राखता येत नाही म्हणूनच काही उत्पादने विशिष्ट भागातील उत्पादने म्हणून प्रसिध्द असतात त्यामुळे शेतकऱ्यांना विशिष्ट भागातील फायदा उठविता येतो त्याची निर्यात देखील करता येते. परंतू आता नवीन तंत्रज्ञानामुळे एखाद्या उत्पादनाला चव आणणारे घटक, रंग आणणारे घटक, आकार आणणारे घटक शोधून काढणे शक्य झाले आहे. त्यामुळे एका भागातील उत्पादन दुसऱ्या कोणत्याही भागात घेणे शक्य होणार आहे. त्याबाबतचे प्रयोग जगभर होत आहेत. त्याला यश ही मिळत आहे. त्यामुळे कोणत्याही उत्पादनाची ठराविक भाग मक्तेदारी राहणार नाही हे बदल शेतकऱ्यांना स्वीकारावे लागतील तरच बाजारपेठेत टिकून राहता येईल.

**7. रोबोट सेन्सरचा उपयोग**

ज्याप्रमाणे कारखान्यामध्ये अगणित वस्तुंचे सारखेच उत्पादन मशिनच्या किंवा सेन्सरच्या वापराने करता येते. त्या मशिला एकदा प्रयोग दिला की सहज एक सारख्या अगणित वस्तु तयार करते. या रोबोट किंवा सेन्सर तंत्राचा उपयोग सर्वच ठिकाणी करणे शक्य नसले तरी आज शेती क्षेत्रात बहुतांशी ठिकाणी या तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे. पूर्वी शेती ही पूर्णता मान्सून वर अवलंबून होती परंतू आज शेतीचे मान्सूनवरील अवलंबत्व कमी केल गेल आहे. आज शेतीत यंत्रमानव, ड्रोन, सेन्सर इत्यादीचा वापर वाढलेला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर ही शेतर-यांसाठी नवी पर्वणीच आहे. परंतु हे तंत्रज्ञान महाग असल्यामुळे शेतक-यांनी गट शेतीचा स्वीकार करावा.

**8. पिकांतील जनुकिय बदल :-**

वीसाव्या शतकात भारतासह जगात शेतीतील उत्पादनात जनुकिय बदलाने क्रांती केली. या क्रांती मुळे शेती उत्पादनाच्या काही पिकांमध्ये अगणित वाढ झाली. जनुकिय तंत्रज्ञानात होणारे सर्वच बदल मानवी उन्नतीला पोषक ठरतील असे नाही. त्यातील कोणते बदल स्वीकारावे व कोणते बदल स्वीकारू नये याची पारख करणे सुद्धा तेवढेच कठीण आहे. या जनुकिय तंत्रज्ञानाचा वापर करुन भारतासह जगातील युरोपियन देशानी कापूस, मका, गहू यासारख्या पिकांच्या उत्पादनात मोठा पल्ला गाठला. या जनुकिय तंत्रज्ञानाचा काळाच्या बदला बरोबर शेतक-यांनी सुद्धा योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे. याच्या वापरातून शेती मालात मोलाची वाठ सहज शक्य आहे.

**सारांश:-**

भारत हा कृषी प्रधान देश आहे परंतू या देशात आज घडीला शेतक-यांची दयनिय अवस्था आहे. याचा विचार करता येणा-या काळात भारतासह जगाला शेती हे एकमेव क्षेत्र तारू शकत ही सरकारने विचारात घेऊन शेती क्षेत्राला अवश्यक व हिताचे बदल करणे काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या विकासा बरोबर -हास होणारी पिकांमधील तत्त्वे अबाधित राहण्यासाठी वेळीच उपाय योजना करणे सुद्धा गरजेचे आहे. याबरोबरच शेतक-यांनी सुद्धा उत्पादनाच्या तंत्रज्ञानात होणारे बदल आत्मसात करुन ते शेती क्षेत्रात उपभोगले पाहिजेत. सोबतच जागतिक अर्थव्यवस्थेतील झालेला बदल विचारात घेऊन आपल्या उत्पादनात योग्य बदल केला पाहिजे तरच ख-या अर्थाने शेती क्षेत्राचा विकास होऊ शकेल.

**संदर्भसूची:**

1) https://vishwakosh.marathi.gov.in
2) डॉ. कायंदे-पाटील गं. वि., शेतीचे अर्थशास्त्र, सिद्धांत आणि धोरणे (2007), चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, पृ.क्र. 1
3) https://mr.wikipedia.org/wiki
4) देऊळगावकर अ.,स्वामीनाथन भूकमुक्तीचा ध्यास, तृतीय अवृत्ती 2017, साधना प्रकाशन,पुणे
5) https://www.marathisocial.com/essay-on-agriculture-in-india-in-marathi
6) Hand Book Schemes, Programmes and Missions Promoting Agriculture Devlopment and Farmers Welfare – 2018 P.No. - 7-76
7) Inpact Evaluation of Rashtriya Krishi Vikas Yojana Report -I November 2013 P.No-1
8) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2021-22 पृष्ट क्र.17
9) डॉ. बिराजदार मा. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (2018), विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद. पृ.क्र.86